## प्रेसनोट दिनांक १५/०३/२०२३

# अल्पवयीन मुलाकडून जबरदस्तीने चोरी केलेला मोबाईल हस्तगत करुन, जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस.

## खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा यांची कामगिरी

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील चेन स्नॅचिंग, वाहन चोरी, मोबाईल चोरी, घरफोडीचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणावेत याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकाकडील स्टाफमार्फत उघडकीस न आलले मोबाईल स्नॅचिंग, जबरी चोरी गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना, पोहवा सुनिल कानगुडे यांना मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरुन, वृंदावन हॉटेलजवळ, येवले अमृततुल्य समोर, जाधववाडी, पुणे याठिकाणी सापळा लावुन, अल्पवयीन मुलास ताब्यात घेवुन, त्याचे **अंगझडतीमध्ये कि. १०,०००/-रुचा एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन** मिळुन आला. त्याबाबत त्यास विश्वासात घेवुन विचारपुस करता, त्याने त्याचे मित्र रोहन व त्याचे सोबत असलेल्या इसमासह रावेत येथे फोनवर बोलत पायी जाणाऱ्या महिलेचा मोबाईल हिस्कावुन घेवुन, गेल्याचे सांगितले. त्याबाबत रावेत पोलीस ठाणे येथे खात्री करता, सदर मोबाईल चोरी बाबत **रावेत पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १३२/२०२३ भादवि कलम ३९२ प्रमाणे** गुन्हा दाखल असल्याने, सदरचा मोबाईल जप्त करुन, अल्पवयीन मुलास पुढील कारवाई कामी रावेत पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास रावेत पोलीस स्टेशन हे करत आहे.

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पो.उप-निरी.अशोक दुधवणे,अमर राऊत, पोलीस अंमलदार रमेश गायकवाड, सुनिल कानगुडे, निशांत काळे, रमेश मावसकर, किरण काटकर, प्रदीप गोडांबे, विजय नलगे, ज्ञानेश्वर कु-हाडे, आशिष बोटके, गणेश गिरीगोसावी, शैलेश मगर, सुधीर डोळस, प्रदीप गायकवाड व प्रदीप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner